Indian Streams Research Journal
Volume 2, Issue. 7, Aug 2012
ISSN:-2230-7850

Available online at www.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# महाराष्ट्रातील लिंग गुणोत्तराचे अभिक्षेत्रीय वितरण

*सदानंद एच. गोने*

उज्वल ग्रामीण महाविद्यालय, घोणसी ता. जळकोट

***प्रस्तावना :***

लोकसंख्या भुगोल ही भूगोलाची एक मुलभुत शाखा आहे. लोकसंख्या शास्त्राच्या अभ्यासात लिंग गुणोतराच्या अभ्यासाला अतिशय महत्त्व प्राप्त झालेले आहे. लिंग गुणोतर हे प्रत्यक्ष जन्मदर व मृत्युदर यावर अवलंबुन असतो. लोकसंख्येचे स्थलांतर व लोकसंख्येची रचना याचा प्रत्यक्ष परिणाम लिंग गुणोत्तरावर झाल्याचे दिसून येते. लोकसंख्येच्या लिंग गुणोत्तरावर त्या त्या प्रदेशातील नैसर्गिक, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक परिस्थितीचा प्रभाव असतो. लोकांचा राहणीमानाचा दर्जा, शिक्षण, धर्म, राष्ट्रिय उत्पन्न, सामाजिक व आर्थिक परिस्थिती इ. घटकावर लिंग गुणोत्तर अवलंबुन असते. भारतातील एकूण लिंग गुणोत्तर हे दर हजार पुरुशामागे 993 स्त्रिया एवढे आढळुन येते तर महाराष्ट्रात हेच प्रमाण 922 एवढे असल्याचे दिसुन येते.

***अभ्यासक्षेत्र :***

भारतातील महाराष्ट्र राज्य हे औद्योगिकदृष्टया एक अग्रेसर राज्य असून ते भारतीय संघराज्यात मध्यवर्ती व महत्त्वाचे राज्य आहे. महाराष्ट्राचा अंक्षाशीय विस्तार 15044' उत्तर अक्षवृत ते 2206' उत्तर अक्षवृत असुन रेखांशीय विस्तार 72036' पूर्व ते 80.54' पूर्व रेखावृत्त दरम्यान आहे. पश्चिमेस अरबी समुद्रपासुन पूर्वस साधारणपणे पूर्व घाटापर्यंत महाराष्ट्र राज्य पसरलेला आहे. महाराष्ट्राची पश्चिम–पूर्व लांबी सुमारे 800 कि.मी. असुन दक्षिणोत्तर रूंदी सुमारे 720 कि.मी. आहे. महाराष्ट्राचे क्षे़त्रफळ 307713 चौ.कि.मी. आहे.

उद्दिष्टये :

महाराष्ट्रातील लिंगगुणोत्तर वितरणाचा स्थल व काल सापेक्ष आभ्यास करणे व महाराष्ट्रातील जिल्हानिहाय लिंग गुणोत्तरात झालेल्या बदलाचा अभ्यास करणे या मुख्य वैशिष्टयाचा आभ्यास प्रस्तुत शोधनिबंधात करण्यात आला आहे.

अभ्यास पध्दती व आकडेवारी संकलन

प्रस्तुत शोध निबंधासाठी वापरलेली आकडेवारी ही दुय्यम स्वरूपाची असुन ती महाराष्ट्र राज्य जनगणना अहवाल 1991 व 2001 या मधुन घेतलेली आहे. महाराष्ट्रातील जिल्हानिहाय लिंग गुणोत्तर काढण्यासाठी जिल्हयातील एकूण पुरूष व एकूण स्त्रिया याचा आधार घेतलेला आहे 1991 मध्ये महाराष्ट्रात एकूण 33 जिल्हे होते तर 2001 मध्ये महाराष्ट्रातील एकूण जिल्हयातील संख्या 35 एवढी आहे या संपुर्ण जिल्हयाची आकडेवारी संकलीत करूण प्रचलीत सुत्राच्या सहायाने लिंग गुणोत्तर काढलेले आहे.

लिंगगुणोत्तरत्र   एकूण स्त्रिया X 1000
एकूण पूरूष

वरील सुत्राच्या आधारे काढलेल्या लिंग गुणोत्तराचे तीन गटात विभाजन करून सविस्तर आभ्यास करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

***महाराष्ट्रातील जिल्हानिहाय लिंग गुणोत्तर***

महाराष्ट्रातील जिल्हानिहाय लिंग गुणोत्तराचा आभ्यास करण्यासाठी लिंग गुणोत्तराचे पुढील तीन गट पाडले आहेत त्यातील पहिला गट कमी लिंग गुणोत्तराचा असुन त्याचे 925 पेक्षा कमी लिंग गुणोत्तर आहे. दुसरा गट 926 ते 950 लिंग गुणोत्तराचा असुन तो मध्यम लिंग गुणोत्तराचा गट म्हणून ओळखला जातो, तर तीसरा गट जास्त लिंग गुणोत्तराचा असुन यात 951 पेक्षा अधिक लिंग गुणोत्तराचा समावेश होतो.

महाराष्ट्राच्या लिंग गुणोत्तराचा आभ्यास करत असताना सन 1991 च्या जनगणने नुसार 33 जिल्हयाचा अभ्यास केला आहे. सन 2001 मध्ये गोंदिया व हिंगोली या दोन जिल्हयाची वाढ होवुन महाराष्ट्रात एकूण 35 जिल्हे झाले आहेत.

सन 1991 च्या आकडेवारीच्या आधारे महाराष्ट्रातील एकूण 33 जिल्हयापैकी सर्वाधिक 16 जिल्हे हे मध्यम लिंगगुणोत्तराच्या गटात येतात ते महाराष्ट्रातील एकूण जिल्हयाच्या 48.48 टक्के एवढे आहेत सर्वात कमी दोन जिल्हे (06.06) कमी लिंग गुणोत्तराच्या गटात येतात त्यांचे लिंग गुणोत्तर हे 925 पेक्षा कमी असलेले दिसुन येते तर 15 जिल्हे हे 951 पेक्षा अधिक लिंग गुणोत्तर असलेल्या म्हणजेच जास्त लिंग गुणोत्तराच्या गटात येतात.

महाराष्ट्रातील 1991 मधील 33 जिल्हयाच्या लिंग गुणोत्तराचा अभ्यास केला असता, सर्वाधिक 16 जिल्हे 926 ते 950 एवढे लिंग गुणोत्तर असलेल्या मध्यम लिंग गुणोत्तराच्या गटात येतात त्यात अमरावती 950, अहमदनगर 949, धुळे, लातूर व उस्मानाबाद 947, बुलढाणा 945, पुणे 943, मुंबई 942, सातारा व वाशिम 941, बीड 939, सोलापूर 935, औरंगाबाद 933, कोल्हापूर 931, मुंबई उपनगर 930 व अकोला 926 या

**Please cite this Article as :** *सदानंद एच. गोने , महाराष्ट्रातील लिंग गुणोत्तराचे अभिक्षेत्रीय वितरण* **: Indian Streams Research Journal (Aug. ; 2012)**

जिल्हयाचा समावेश होतो. तर सर्वात कमी हे दोन जिल्हे कमी लिंग गुणोत्तराच्या गटात म्हणजेच 925 पेक्षा कमी लिंग गुणोत्तर असलेल्या गटात येतात यामध्ये सांगली 924 व जळगाव 925 या दोन जिल्हयाचा समावेश होतो उर्वरीत 15 जिल्हे 951 पेक्षा अधिक लिंग गुणोत्तर असलेल्या जास्त लिंग गुणोत्तराच्या गटात येतात. या मध्ये नंदुरबार 977, यवतमाळ 969, चंद्रपुर 965, भंडारा 964, सिंधुदुर्ग 963, रत्नागिरी व रायगड 961, गडचिरोली 960, नांदेड 960, परभणी 956, नाशिक 954, ठाणे व वर्धा 952, जालना व नागपूर 951 या जिल्हयाचा समावेश होतो.

सन 2001 च्या जनगणने नुसार महाराष्ट्रातील एकूण 35 जिल्हयापैकी सर्वाधिक 16 जिल्हे हे कमी लिंग गुणोत्तराच्या गटात येतात त्यांचे हे प्रमाण महाराष्ट्रातील एकुण जिल्हयाच्या 45.71 टक्के एवढे आहे तर सर्वात कमी 4 जिल्हे हे जास्त लिंग गुणोत्तराच्या गटात येतात ते महाराष्ट्रातील एकूण जिल्हयाच्या 11.43 टक्के एवढे आहेत उर्वरीत 42.86 टक्के जिल्हे म्हणजे 15 जिल्हे हे मध्यम लिंग गुणोत्तराच्या गटात येतात.

**तक्ता क.1**

**महाराट्रातील लिंग गुणोत्तर (1991. 2001)**

| गट | 1991 | टक्केवारी | 2001 | टक्केवारी | बदल | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| 925 पेक्षा कमी | 02 | 06.06 | 16 | 45.71 | +4 | 40.00 |
| 926 ते 950 | 16 | 48.48 | 15 | 42.83 | −1 | 2.86 |
| 951पेक्षा जास्त | 15 | 45.45 | 04 | 11.43 | −11 | 31.43 |
| एकूण | 33 | 100 | 35 | 100 | +2 | 06.06 |

स्त्रोतः महाराष्ट्र जणगणना अहवाल, 1991 व 2001

महाराष्ट्रातील एकूण 35 जिल्हयाच्या लिंग गुणोत्तराचा अभ्यास केंला असता सर्वाधिक 16 जिल्हे हे 925 पेक्षा कमी लिंग गुणोत्तर असलेल्या कमी लिंग गुणोत्तराच्या गटात येतात त्या मध्ये लातूर 923, वाशिम 921, मुंबई उपनगर 919, बुलढाणा 915, जालना 914, धुळे 907, पुणे 906, बीड व मुंबई 898, सोलापूर 897, अहमदनगर 890, औरंगाबाद व सातारा 884, जळगाव 867, कोल्हापूर 859 व सांगली 850 या जिल्हयाचा समावेश होतो 926 ते 950 या मध्यम लिंग गुणोत्तरच्या गटात एकुण 15 जिल्हे येतात त्यात नागपूर 949, गडचिरोली व उस्मानाबाद 947, अमरावती व सिंधूदुर्ग 946, चंद्रपूर व नांदेड 944, रायगड 943, यवतमाळ 942, अकोला व नाशिक 936, वर्धा 934, हिंगोली 935, ठाणे 933 आणि परभणी 926 यांचा समावेश होतो. जास्त लिंग गुणोत्तरच्या गटात म्हणजे 951 पेक्षा अधिक लिंग गुणोत्तर असलेल्या गटात नंदूरबार 966, गोंदिया 964, भंडारा 958 व रत्नागिरी 954 या चार जिल्हयाचा समावेश होतो. (तक्ता क्र.1)

जिल्हानिहाय लिंग गुणोत्तरातील बदल (1991 व 2001)

महाराष्ट्रातील विविध जिल्हयाच्या लिंग गुणोत्तरात सन 1991 ते 2001 च्या दहा वर्षाच्या कालावधीत अकोला जिल्हा वगळता सर्वच जिल्हयात लिंग गुणोत्तर कमी झालेले आहे. 1991 मधील लिंग गुणोत्तराच्या तुलनेत 2001 मधील लिंग गुणोत्तर हे कमी झाल्याचे दिसुन येते.

**तक्ता. क. 2**

**महाराश्ट्रातील जिल्हानिहाय लिंग गुणोत्तर (1991 ते 2001)**

| जिल्हे | 1991 | 2001 | बदल | जिल्हे | 1991 | 2001 | बदल |
|---|---|---|---|---|---|---|---|
| औरंगाबाद | 933 | 884 | - 49 | रायगड | 961 | 943 | - 18 |
| जालना | 961 | 914 | - 37 | पुणे | 943 | 906 | - 37 |
| परभणी | 966 | 926 | - 30 | अहमदनगर | 949 | 890 | - 59 |
| हिंगोली | —— | 935 | —— | नंदुरबार | 977 | 966 | - 11 |
| नांदेड | 960 | 944 | - 16 | धुळे | 947 | 907 | - 40 |
| बीड | 939 | 898 | - 41 | जळगाव | 925 | 867 | - 58 |
| लातूर | 947 | 923 | - 24 | बुलढाणा | 945 | 915 | - 30 |
| उस्मानाबाद | 947 | 927 | - 20 | अकोला | 926 | 936 | +10 |
| सोलापूर | 935 | 897 | - 38 | वाशिम | 941 | 921 | - 20 |
| सातारा | 941 | 884 | - 57 | अमरावती | 960 | 947 | - 03 |
| रत्नागिरी | 961 | 954 | - 07 | वर्धा | 962 | 934 | - 18 |
| सिंधुदुर्ग | 963 | 946 | - 17 | नागपूर | 951 | 949 | - 02 |
| कोल्हापूर | 931 | 859 | - 72 | भंडारा | 964 | 958 | - 06 |
| सांगली | 924 | 850 | - 74 | गोंदिया | —— | 964 | —— |
| नाशिक | 954 | 936 | - 18 | गडचिरोली | 980 | 947 | - 33 |
| ठाणे | 952 | 933 | - 19 | चंद्रपूर | 965 | 944 | - 21 |
| मुंबई उपनगर | 930 | 919 | - 11 | यवतमाळ | 969 | 942 | - 27 |
| मुंबई | 942 | 989 | - 14 | | | | |

स्त्रोतः महाराष्ट्र जणगणना अहवाल, 1991 व 2001

अकोला जिल्हयात 1991 मध्ये दर हजार पुरूषा मागे स्त्रियांची संख्या 926 एवढी होती त्यात वाढ होवुन 2001 मध्ये दर हजार पुरूषा मागे स्त्रियांची संख्या 936 एवढी झाली आहे. म्हणजे 1991 ते 2001 या दहा वर्षाच्या काळात दर हजार पुरूषा मागे स्त्रियांची संख्या दहाने वाढली आहे. महाराष्ट्रातील सांगली जिल्हयात 1991 ते 2001 या दहा वर्षाच्या काळात दर हजार पुरूषा मागे स्त्रियांचे प्रमाण सर्वाधिक कमी झालेले दिसुन येते. या जिल्हयात 1991 मध्ये दर हजार पुरूषा मागे 924 स्त्रिया होत्या त्या 2001 मध्ये 74 ने कमी होवुन 850 एवढया झाल्या आहेत तर दर हजार पुरूषा मागे स्त्रियांचे प्रमाण कमी होण्याचे प्रमाण नागपूर जिल्हयात सर्वात कमी असुन या जिल्हयात 1991 ते 2001 या कळात दर हजार पुरूषा मागे फक्त 2 स्त्रिया कमी झाल्या आहेत या जिल्हयात 1991 मध्ये दर हजार पुरूषामागे 951 स्त्रिया होत्या तर 2001 मध्ये हेच

स्त्रियांचे प्रमाण 949 एवढे झाले आहे.

उर्वरीत सर्व जिल्हयात 1991 ते 2001 या दहा वर्षाच्या कळात दर हजार पूरूषामागे स्त्रियांचे प्रमान कमी झाले आहे या मधिल अहमदनगर या जिल्हयात 59 स्त्रिया कमी झाल्या आहेत तर जळगाव 58, सातारा 57, औरंगाबाद 49, मुंबई 44, नाशिक 41, धुळे 40, सोलापूर 38, जालना व पुणे 37, गडचिरोली 33, बुलढाणा व परभणी 30, यवतमाळ 27, लातूर 24, चंद्रपूर 21, वाशिम व उस्मानाबाद 20, ठाणे 19, रायगड, वर्धा व नाशिक 18, सिंधुदूर्ग 17, नांदेड 16, मुंबई उपनगर व नंदूरबार 11, रत्नागिरी 07, व भंडारा जिल्हयात 06 एवढया स्त्रिया दर हजार पूरूषा मागे कमी झाल्या आहेत.

***निष्कर्ष :***

महाराष्ट्रातील लिंग गुणोत्तर अभ्यासले असता ज्या जिल्हयातील लिंग गुणोत्तर हे 925 पेक्षा कमी आहे त्या जिल्हयात रस्ते, लोहमार्ग व औद्योगिक विकास झालेला दिसून येतो. ज्या जिल्हयात दळणवळण व वाहतूकीच्या सुविधा उपलब्ध आहेत तसेच जिल्हयाचा औद्योगिक विकास झालेला आहे त्या जिल्हयात महाराष्ट्रातील इतर जिल्हयातून पुरुष मंडळी रोजगारानिमित्ताने येतात व ते तेथेच स्थायिक होतात. म्हणून या जिल्हयात पुरुषांचे प्रमाण वाढते व स्त्रियांचे प्रमाण कमी होते म्हणजेच या जिल्हयात लिंग गुणोत्तर कमी झाल्याचे दिसून येते. याउलट ज्या जिल्हयाचा औद्योगिक विकास तितकासा झालेला नाही व तेथे वाहतूक व दळणवळणाच्या सुविधा उपलब्ध नाहीत त्या जिल्हयातील पुरुष मंडळी इतर विकसित जिल्हयात कामानिमित्ताने जातात. याचा परिणाम लिंग गुणोत्तरावर होतो. म्हणजेच अशा जिल्हयातील पुरुषांची संख्या कमी होते व स्त्रियांची संख्या वाढते. म्हणजेच या जिल्हयाचे लिंग गुणोत्तर वाढलेले दिसून येते. तसेच विकसित जिल्हयातील लोकसंख्येची साक्षरता ही अधिक असल्याचे दिसून येते म्हणून तेथील लोक मुलींना जन्म घालण्याच्या बाबतीत जागरुक असतात त्यातून मुलींच्या जन्माचे प्रमाण कमी होते व लिंग गुणोत्तर कमी होत असल्याचे दिसून येते.

***संदर्भ :***

1) भारतीय जनगणना अहवाल जिल्हा जालना, 1991–2001

2) Mehta, B.C. (1978):"A Regional Population Growth-A Case Study of Rajasthan", Jaipur, P.89

3) Mohankumar, M.D. and Shivlingappa, B.N. (2003)) : "Pattern of Sex Ratio in Karnataka-A Spatio Temporal Analysis", National Geographer, Vol.38, No.2, Pp.149-158.

4) Trewartha, G.T. (1969) : "A Geography of Population : World Patterns", John Wiley and Sons, Inc. New York, P.114.

5) गोने सदानंद व गोने पद्माकर (2012) चाकूर तालुक्यातील लिंग रचनेचे अभिक्षेत्रीय वितरण, शोधांकन स्पेशल इश्यू, पृ.क्र.77–79